





# महाराष्ट्र शासन

## अर्थसंकल्पः २०१७-१८

# आदिवासी विकास विभाग

**समर्थन**


**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

११५- समर्थन, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई स्थानकासमोर,

वसई (पू), पालघर -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३/४

Email: samarthanmumbai97@gmail.com website: www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

संपादन :
**मुक्ता भारती**

संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
**मॅकेन्झी डाबरे** - ९६६५००६४२९

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**
**सोनल सहस्त्रबुद्धे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. पालघर -४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

## लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

**'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर**

- ◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.
- ◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.
- ◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.
- ◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.
- ◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.
- ◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.
- ◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.
- ◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.
- ◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# पुस्तिका वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- 'समर्थन'ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती पुस्तिकेचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१०-११ पासून २०१७-१८ पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.

- विवेक पंडित
संस्थापक, समर्थन
९८२३१४७००३
pvivek2308@gmail.com

# आदिवासी विकास विभाग

## १५ जिल्हे ८० हून अधिक तालुक्यात विखुरलेले राज्यातील आदिवासी :

राज्यातील लोकसंख्येचा बहुतांश वंचित व दुर्लक्षित घटक असणारे हे आदिवासी लोक आहेत.समाजातील कमकुवत घटकांपैकी आदिवासी घटक अत्यंत दुर्बल असून भारतीय घटनेच्या कलम ४६ नुसार अनुसूचित जाती/जमातींच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास करण्याकरिता व त्यांना सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासून संरक्षण देण्यास शासन कटिबद्ध आहे. त्याप्रमाणे आदिवासी क्षेत्राचा तसेच या क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्यासाठी केंद्र शासनाने केलेल्या सूचना व मार्गदर्शक तत्त्वे यानुसार राज्य शासनाने आदिवासींसाठी एक स्वतंत्र जनजाती क्षेत्र उपयोजना सन १९७५-७६ मध्ये तयार केली व त्याची अंमलबजावणी १ एप्रिल १९७६ पासून सुरू केली. या आदिवासी उपयोजनेमध्ये महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यातील ६८ तालुक्यामधील ६,९६२ गावे व १२ शहरे यांचा समावेश आहे. जरी अनुसूचित जमाती किंवा आदिवासी ही संज्ञा वापरलेली असली तरी, आदिवासी लोक हे एकजिनसी संस्था नाही. आदिवासींमध्ये विकासाबाबत त्यांना उपलब्ध संधीनुसार जो असमतोल आहे. त्यामुळे राज्यातल्याच ठाणे जिल्ह्यातील आदिवासी व गडचिरोली सारख्या जिल्ह्यातील आदिवासी यांच्यात फरक दिसून येतो. आदिवासी जमातींच्या सामाजिक-आर्थिक परिस्थिती ठरवताना त्यांच्या सद्य:स्थिती विषयीची संकलित न केलेली आकडेवारी ही प्रमुख अडचण आहे. अशी आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे उर्वरित लोकसंख्येच्या तुलनेत त्यांचे जे नुकसान झाले त्याची निश्चिती करणे अशक्य बनले आहे. महाराष्ट्रामध्ये ४७ जमातींना अनुसूचित जमाती म्हणून दर्शविण्यात आलेले आहे.

आदिवासी प्रामुख्याने राज्यातील सह्याद्री, सातपुडा व पूर्व गोंडवाना या तीन दुर्गम, डोंगराळ व आडवळणी वन क्षेत्रांमध्ये राहतात. राज्याच्या सीमेवर त्यांची वसतिस्थाने आहेत. अशाप्रकारे भौगोलिक अंतरामुळे आदिवासी लोकांचे शोषण सुरू आहे. दुसरी गोष्ट अशी की, या जमाती १५ जिल्ह्यांमध्ये आणि ८० हून अधिक तालुक्यांच्या ठिकाणी विखुरलेल्या आहेत. जरी त्या ऐतिहासिकदृष्ट्या या लगतच्या भूभागांमध्ये वसलेल्या असल्या तरी, अलिकडील वर्षांमध्ये अनेक क्षेत्रांपैकी कित्येक क्षेत्रात अल्पसंख्य बनलेल्या आहेत. तिसरी गोष्ट अशी आहे की, आदिवासी लोकांना अधिकारापासून वंचित ठेवणे व त्यांचे शोषण करणे यास एक ऐतिहासिक दुवा आहे. वसाहतवादाच्या काळात ब्रिटिशांनी त्यांना त्यांच्या वडिलोपार्जित भूसंपदा व वन हक्क यांच्यापासून वंचित ठेवले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, जरी भारताच्या संविधानाने विविध संरक्षक उपाययोजना व हमी यांची तरतूद केलेली असली तरी, आदिवासी हे प्रशासकीय बेजबाबदारपणाचे व बिगर आदिवासी लोकांकडून होणाऱ्या शोषणाचे बळी ठरले होते. चौथी गोष्ट, त्यांची संस्कृती व भाषा ही उद्योगकेंद्रीत शक्तींनी धोक्यात आणलेली आहे. आदिवासी लोकांमधील विकास विषयक वैफल्य व असंतोष यात वाढ होत असल्याचे अलिकडे दिसून येत आहे आणि विवक्षित जिल्ह्यात याची तीव्रता अधिक असल्याचे दिसून येते.

## राज्यातील लोकसंख्येत १००लोकांमागे ९ आदिवासी:

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी २३ लाख इतकी असून, त्यापैकी आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी आहे. ही राज्याच्या लोकसंख्येच्या ९.३५ टक्के इतकी आहे. महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र ३,०७, ७१३ चौ. कि. मी. एवढे असून त्यापैकी ५०,७५७ चौ. कि. मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण १६.५ टक्के एवढे होते. महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीचे यादीत एकूण ४७ आदिवासी जमातींचा समावेश असून, त्यातील प्रमुख जमाती भिल्ल, महादेव कोळी, परधान, डोंगर कोळी, राजगोंड, वारली, कोकणा, ठाकूर, ठाकर, काथोडी कोळी, मल्हार, आंध, कोरकू, धाणका या आहेत.

## राज्यातील आदिवासींना शिक्षण अजून कोसो दूरच :

राज्याची सर्वसाधारण लोकसंख्या व अनुसूचित जमाती यांच्यातील विकासाची तुलना करता वास्तव लक्षात येते. पुरुष साक्षरतेमध्ये अनुसूचित जमाती सर्वसाधारण लोकसंख्येच्या जवळजवळ २० टक्क्यांनी मागे पडल्या आहेत. तसेच महिला साक्षरतेमध्ये अनुसूचित जमाती सर्वसाधारण लोकसंख्येच्या अंदाजे ४१ टक्क्यांनी मागे पडल्या आहेत. एकूण नाव नोंदणीच्या प्रमाणात देखील अनुसूचित जमाती खूपच मागे पडल्या आहेत. ६-१७ वर्षे वयोगटातील शालाबाह्य मुलांमध्ये ३४.५ टक्के इतकी मुले अनुसूचित जमातीतील आहेत, तर १५.९ टक्के इतकी सर्वसाधारण लोकसंख्येतील आहेत. अनुसूचित जमातींसाठी ५-२९ वर्षे वयोगटातील प्रति विद्यार्थी सरासरी वार्षिक खर्च फक्त रुपये १२९७ इतका आहे. तर सर्वसाधारण विद्यार्थ्यांवरील दरडोई खर्च रुपये ४५११ इतका आहे. आरोग्याबाबत अनुसूचित जमातीतील मुलांची प्रतिकारक्षमता ३९.३ टक्के इतकी आहे आणि सर्वसाधारण लोकसंख्येकरिता हीच आकडेवारी ६२.२ टक्के इतकी आहे.

## महाराष्ट्रातील शंभरातील ९१ आदिवासी कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली :


जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणाने केलेल्या दारिद्र्यरेषेखालील सर्वेक्षणातून असे दिसून येते की, १९८० मध्ये ६३.७% आदिवासी कुटुंबे दारिद्र्यरेषेच्या खाली होती तर १९९६-९७ मधील संदर्भ (bench mark) सर्वेक्षणामध्ये, उपयोजना क्षेत्रांमधील ९१.१% आदिवासी कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली असल्याचे निश्चित केले आहे. ( महाराष्ट्र शासन, २०१२ (ए): ४६७) संपूर्णत: आदिवासी लोकांमधील दारिद्र्य हे राज्याच्या जवळजवळ दुप्पट होते. याबाबत आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून अलिकडची राज्यव्यापी आकडेवारी उपलब्ध झालेली नव्हती.यावरून आदिवासी हा विकासाचा केंद्रबिंदू कोणत्याही शासनाच्या काळात प्राधान्यक्रमावर नव्हता.

आदिम जमाती गटांची (कातकरी, माडिया गोंड व कोलाम) त्याचप्रमाणे पारधी जमातीची स्थिती, इतर आदिवासी समूहापेक्षा अतिशय दयनीय आहे.

# विभागाचा मागील ६ वर्षात सरासरी वार्षिक खर्च केवळ ४ हजार ६०० कोटी रुपये!

आलेख क्र.१ (रु. कोटीत)

**आदिवासी विकास विभागाचा अर्थसंकल्प**





| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ अर्थसंकल्पीय अंदाज | ३८४४ | ४७४७ | ५३२२ | ५६१९ | ६५०३ | ७७९२ | ७६४३ | ८८१७ |
| □ सुधारित अंदाज | ३७७७ | ४४४४ | ४७८७ | ५५९३ | ६९८४ | ७५९५ | ७७०० | |
| ▨ प्रत्यक्ष खर्च | ३१८२ | ४००५ | ४४०१ | ५२६० | ५८२८ | ६२५९ | | |

*(स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व वित्तविषयक विवरणपत्र)*
*(टीप: वर्ष २०१६-१७ चे सुधारित अंदाज व वर्ष २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **राज्यात वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ०५ लाख १० हजार २१३ इतकी असूनही राज्याच्या अर्थसंकल्पात विभागाचा वाटा केवळ २.५६ टक्के इतका आहे.**
- **वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ चा प्रत्यक्ष खर्च पाहिल्यास लक्षात येते की, राज्य शासन हे सातत्याने आदिवासी विकास विभागाला सुधारित अंदाजापेक्षा कमी प्रमाणात निधी उपलब्ध करून देत आल्याचे दिसून येते.**
- **वर्ष २०१५-१६ मध्ये विभागाने सुधारित अंदाज रु. ७ हजार ५९५ कोटी इतका केला होता मात्र तेवढा निधी उपलब्ध झाला नाही व रु. ६ हजार २५९कोटी इतकाच निधी उपलब्ध करून देण्यात आला.**
- **वर्ष २०१०-११ ते वर्ष २०१५-१६ पर्यंत आदिवासी विकास विभागाचा सरासरी वार्षिक खर्च रु.४ हजार ६०० कोटी इतका आहे.**

# आदिवासी विकास विभागातील योजनांसाठी निधीची वानवा!

आलेख क्र. २ | रु. कोटीत




| | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ अर्थसंकल्पीय अंदाज | ३०९९ | ३८८१ | ४३१८ | ४४८१ | ५२६४ | ६४६१ | ६२४६ |
| □ सुधारित अंदाज | २९३५ | ३५०२ | ३७६४ | ४४५९ | ५७६८ | ६३७२ | ५०९९ |
| ■ प्रत्यक्ष खर्च | २३७२ | ३०९५ | ३४०० | ४१६२ | ४७०७ | ६४१४ | |

*(स्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व वित्तविषयक विवरणपत्र)*

*(टीप: वर्ष २०१६-१७ सुधारित अंदाज व वर्ष २०१७-१८ अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **वरील आलेख पाहता शासनाने आदिवासींच्या योजनांसाठी सुधारित अंदाजा एवढा निधी कधीच उपलब्ध करून दिलेला नाही.**
- **आदिवासी विकास विभागाचा योजनांतर्गत खर्च हा राज्याच्या एकूण अर्थसंकल्पातील योजनांतर्गत खर्चात ९ टक्के असला तेवढा निधी उपलब्ध होत नाही, अनेकदा हा निधी विविध विभागांना वळविला जातो, जे रोखण्याची आज गरज आहे.**
- **वर्ष २०१६-१७ मध्ये योजनांतर्गत खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु. ६ हजार २४६ कोटी होते. तर सुधारित अंदाज रु.१ हजार १४७ कोटींनी कमी करून रु. ५ हजार ९९ कोटी इतके झाले आहेत. वरील आलेखाचा कल पाहता प्रत्यक्षात खर्च हा कमी होणार हे निश्चित.**
- **वर्ष २०१५-१६ मध्ये योजनांतर्गत खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु. ६ हजार ४६१ कोटी होते व सुधारित अंदाज रु. ६ हजार ३७२ कोटी होता.**
- **वर्ष २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. ६ हजार २४६ कोटी इतका होता. शासन सातत्याने आदिवासी विकास विभागावरील योजनांतर्गत खर्चात कपात करीत आहे.**

# आदिवासी उपयोजनेचा अनुशेष

## आदिवासींच्या हक्काचे रु. १२ हजार ६०० कोटी ८१ लाख शासनाने हडपले!

### आदिवासी उपयोजनेचा अनुशेष

तक्ता क्र. १ रु.कोटीत

| वर्ष | वार्षिक योजना नियतव्यय | वार्षिक योजनेचा अपेक्षित खर्च | आ. उ.योजना ९ टक्क्या प्रमाणे अपेक्षित तरतूद | आदिवासी उपयोजना प्रस्तावित तरतूद | प्रत्यक्ष खर्च | अनुशेष (४-६) | आ.उ.यो.वरील खर्चाची वार्षिक यो.खर्चाशी % | आ.उ.योजने. वरील खर्चाची प्रस्तावित तरतुदीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १९९४-९५ | ४४००.०० | ५१२२.२ | ३९६.०० | ३३०.०० | २७५.०० | १२१ | ५.३६ | ८३.३३ |
| १९९५-९६ | ६०६२.०० | ६६२७.२ | ५४५.५८ | ४१२.५० | ४१२.०० | १३३.५८ | ६.२२ | ९९.८७ |
| १९९६-९७ | ८२८४.०० | ६८४८ | ७४५.५६ | ५८८.५८ | ५३५.०० | २१०.५६ | ७.८१ | ९०.८९ |
| १९९७-९८ | ८३२५.०० | ७९३८ | ७४९.२५ | ५५०.०० | ४९८.०० | २५१.२५ | ६.२७ | ९०.५४ |
| १९९८-९९ | ११६००.७३ | ८१८७.५ | १०४४.०७ | ५६१.०० | ५२०.०० | ५२४.०७ | ६.३५ | ९२.६९ |
| १९९९-०० | १२१६१.६६ | १०४१९ | १०९४.५५ | ५८०.५९ | ४६७.६५ | ६२६.९० | ४.४८ | ८०.५४ |
| २०००-०१ | १२३३०.०० | ९५८६ | ११०९.७० | ५२५.०० | ४४४.०८ | ६६५.६२ | ४.६३ | ८४.५९ |
| २००१-०२ | ११७२०.०० | ८५२६.१ | १०५४.८० | ५६७.०० | ३६६.७७ | ६८८.०३ | ४.३० | ६४.६८ |
| २००२-०३ | ११५६२.०० | ७५३८.७ | १०४०.५८ | ५८५.०० | ३२३.४२ | ७१७.१६ | ४.२९ | ५५.२८ |
| २००३-०४ | १२०५२.०० | ८१८७.७ | १०८४.६८ | ५५५.७३ | ४५०.२२ | ६३४.४६ | ५.४९ | ८१.०१ |
| २००४-०५ | ९६६५.२५ | ९८१७.४ | ८६९.८७ | ५३०.०४ | ३७६.४६ | ४९३.४१ | ३.८३ | ७१.०२ |
| २००५-०६ | ११०१४.०३ | १४६७४ | ९९१.२६ | ९९०.०० | ९२८.५३ | ६२.७३ | ६.३२ | ९३.७९ |
| २००६-०७ | १४८२९.०० | १५६८१ | १३३४.६१ | १३८९.०० | १३२३.०० | ११.६१ | ८.४४ | ९५.२४ |
| २००७-०८ | २०२००.०० | १९४२२ | १८१८.०० | १७९८.०० | १६५८.८८ | १५९.१२ | ८.५४ | ९२.२६ |
| २००८-०९ | २५०००.०० | २२८६१ | २२५०.०० | २२३८.५० | २०२७.४२ | २२२.५८ | ८.८६ | ९०.५७ |
| २००९-१० | २६०००.०० | २७७३१ | २३४०.०० | २३१४.०० | २१३०.०१ | २०९.९९ | ७.६८ | ९२.०४ |
| २०१०-११ | ३७९१७.०० | ३२५७७ | ३४१२.५३ | ३३७४.३५ | २३२३.१५ | १०८९.३८ | ७.१३ | ६८.८४ |
| २०११-१२ | ४१०००.०० | ३७७०७ | ३८५४.०० | ३६९३.५० | ३१०६.०० | ७४८.०० | ८.२३ | ८४.०९ |
| २०१२-१३ | ४५०००.०० | ३५८६६ | ४२३०.०० | ४००५.०० | ३४०२.५२ | ८२७.४८ | ९.४८ | ८४.९५ |
| २०१३-१४ | ४९०००.०० | ३८०४८ | ४६०६.०० | ४१७७.४८ | ३२६८.१७ | १३३७.८३ | ८.५८ | ७८.२३ |
| २०१४-१५ | ५१२२२.५४ | ५१२२२ | ४८१४.९२ | ४८१४.९२ | ४०९०.२१ | ८७३.८२ | ७.६४ | ८१.८५ |
| २०१५-१६ | ५४९९९.०० | ५४९९९ | ५१७०.०० | ५१७०.०० | ३१७८.२३ | १९९२.२३ | ३.८५ | ६०.१० |
| | | | | | एकूण | १२६००.८१ | | |

*(स्त्रोत: वार्षिक कार्यक्रम २०१७-१८ (विभागवार) व आदिवासी उपयोजना २०१६-१७*

- **सन १९९५-९६ ते २०१५-१६ या कालावधीत एकाही वर्षी शासनाने आदिवासी उपयोजनेसाठी राज्य योजनेतील ९ टक्के खर्च केलेला नाही.**

- **जनगणना २०११ नुसार राज्यात आदिवासींची लोकसंख्या ९.४ टक्के इतकी झाली आहे त्यानुसार त्यांना वार्षिक योजनेच्या प्रमाणात ९.४% नियतव्यय प्रस्तावित करणे गरजेचे होते मात्र जनगणनेचा अहवाल वर्ष २०१३च्या अखेरीस आल्याकारणाने तसे झालेले नाही तरी आता शासनाने वर्ष २०११-१२ नंतरचा अतिरिक्त अनुशेष आदिवासींना देणे गरजेचे आहे.**

- **वर्ष २०१५-१६ मध्ये आदिवासी उपयोजनेसाठी तरतूद रु.५ हजार १७० कोटी इतका निश्चित करण्यात आला होता. त्यापैकी रु. ३ हजार १७८ कोटी २३ लाख उपलब्ध झाला. म्हणजेच तब्बल १ हजार ९९२ कोटी २३लाख इतका निधी कमी उपलब्ध झाला. आजपर्यंतचचा हा नीचांक आहे. युती शासन आदिवासींना कुपोषण व मृत्यूच्या खाईत ढकलत आहे.**

**वर्ष १९९४-९५ पासून वर्ष २०१६-१७ पर्यंत म्हणजेच आदिवासी उपयोजना कार्यान्वित करण्यात आल्यापासून आदिवासींना त्यांच्या हक्काच्या रु. १२ हजार ६०० कोटी ८१ लाखांपासून वंचित ठेवण्यात आलेले आहे. राघोजी भांगरा, नाग्या कातकरी या आदिवासी स्वातंत्र्यसेनानी स्वातंत्र्य लढ्यात स्वत:ला झोकून दिले. मात्र हाच आदिवासी समाज आज स्वातंत्र्यानंतर ६९ वर्षानंतरही शिक्षण, आरोग्य, मूलभूत सोयींपासून वंचित आहे. स्वातंत्र्याच्या साडे सहा दशकानंतरही आदिवासीचा विकास का साधला गेला नाही? कारण त्याच्या विकासासाठीचा निधी हा त्यांच्यापर्यंत पोहोचलाच नाही. त्याच्या वाट्याचे १२ हजार ६०० कोटी ८१ लाख इतक्या निधी त्यांच्या विकासासाठी वापरला न जाण्याला आजवरचे सारे राज्यकर्ते दोषी आहेत का? हा आदिवासींच्या विकास निधीचा अपहार नाही का?**

### आदिवासी उपयोजनेतील जिल्हा नियोजन:

सुकथनकर समितीने अशी शिफारस केली आहे की आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाचा मोठा भाग आदिवासींना प्रत्यक्ष लाभ देणाऱ्या स्थानिक योजनांसाठी दिला पाहिजे. उदा. लहान पाटबंधाऱ्याच्या योजना, मृद आणि जलसंधारण, ग्रामीण पाणी पुरवठा, जोड रस्ते, माता व बाल आरोग्य इत्यादी योजनांना प्राधान्याने निधी उपलब्ध करून गरजेचे असताना देखील जिल्ह्यांसाठी पुरेसा नियतव्यय खर्च करण्यात येत नाही.

# आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी वर्षागणिक घटता नियतव्यय

२०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची एकूण लोकसंख्या १ कोटी ५ लक्ष १० हजार इतकी आहे व ती राज्याच्या ११ कोटी २३ लाख ७४ हजार ३३३ या एकूण लोकसंख्येच्या ९.४ टक्के आहे. राज्यात २०११ च्या जनगणनेनुसार ५१ टक्के आदिवासी आदिवासी उपयोजना क्षेत्रात राहतात व ४९ टक्के आदिवासी उपयोजनेच्या बाहेरील क्षेत्रात राहतात.

१० नोव्हेंबर २००५ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययापैकी ( तरतूदींपैकी) ८५ टक्के नियतव्यय आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी तर १५ टक्के नियतव्यय (तरतूद) आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रासाठी दिला जाणे अपेक्षित आहे. मात्र आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी वर्षागणिक नियतव्यय (तरतूद) घटत चालल्याचे खालील तक्त्यावरून दिसते.

तक्ता. क्र.२ आदिवासी उपयोजनेतील जिल्ह्या नियतव्ययापैकी आदिवासी उपयोजना व उपयोजना क्षेत्राबाह्य नियतव्ययाचे वाटप (रु. लाखात)


| वर्ष | नियतव्यय | | | एकूणचे प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | उपयोजना क्षेत्र | उपयोजनाबाह्य क्षेत्र | एकूण | उपयोजना क्षेत्राशी (अपेक्षित ८५ %) | उपयोजनाबाह्य क्षेत्राशी (अपेक्षित १५ %) |
| २००६-०७ | ४७९६४.३३ | १०६३५.६७ | ५८६००.०० | ८१.८५ | १८.१५ |
| २००७-०८ | ६२८१५.३५ | १६७५०.६५ | ७९५६६.०० | ७८.९५ | २१.०५ |
| २००८-०९ | ८१७८६.७१ | २२०६१.८९ | १०३८४८.६० | ७८.७६ | २१.२४ |
| २००९-१० | ८९४८०.८७ | २६०६४.७३ | ११५५४५.६० | ७७.४४ | २२.५६ |
| २०१०-११ | ८४२२९.९२ | २२५७०.०८ | १०६८००.०० | ७८.८७ | २१.१३ |
| २०११-१२ | १५४६१९.६४ | ४४७००.३६ | १९९३२०.०० | ७७.५७ | २२.४३ |
| २०१२-१३ | १७१२७२.११ | ५०३३७.८९ | २२१६१०.०० | ७७.२९ | २२.७१ |
| २०१३-१४ | १८५५४८.०७ | ५४७५१.९३ | २४०३००.०० | ७७.२२ | २२.७८ |
| २०१४-१५ | २०१८३९.६३ | ५९७८९.१७ | २६१६२८.८० | ७७.१५ | २२.८५ |
| २०१५-१६ | २२४४१८.१३ | ६४४७७.०७ | २८८८९५.२० | ७७.६८ | २२.३२ |
| **एकूण** | **१३५९९७२.९४** | **३८३९०१.२६** | **१७४३८७.२०** | **७७.९८** | **२२.०१** |

(स्त्रोत: आदिवासी उपयोजना वर्ष २००६-०७ ते २०१६-१७ आणि
शासन निर्णय क्र. टीएसपी- २००५/प्र. क्र. ५९/का.६, दिनांक :१० नोव्हेंबर २००५.)

- **वर्ष २००६-०७ ते वर्ष २०१६-१७ या कालावधीत जिल्हा योजनेपैकी आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी उपलब्ध तरतूदीचे प्रमाण केवळ ७७.९८ टक्के आहे तर उपयोजनाबाह्य क्षेत्रासाठी उपलब्ध नियतव्यय (तरतूद) टक्के इतका आहे.**
- **वर्ष २००६-०७ ते वर्ष २०१६-१७ या कालावधीत एकाही वर्षी नियमानुसार ८५ टक्के नियतव्यय (तरतूद) दिला गेल्याचे दिसत नाही. विशेष म्हणजे मागील १० वर्षात देण्यात आलेल्या नियतव्ययाची सरासरी देखील ८५ टक्के होत नाही ती केवळ ७७.९८ टक्के इतकीच होते.**
- **वरील तक्त्यानुसार वर्ष २००६-०७ मध्ये सर्वात जास्त म्हणजे ८१.८५ टक्के नियतव्यय (तरतूद) प्राप्त झाल्याचे दिसते तर वर्ष २०१४-१५ मध्ये सर्वात कमी केवळ ७७.१५टक्के निधी उपलब्ध झाला.**

## राज्याच्या दरडोई जिल्हा उत्पन्नाबाबत विषमतेची प्रचंड दरी

आलेख क्र. ३




*(स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी वर्ष २०१६-१७)*

- सर्वात कमी दरडोई उत्पन्न असलेले तीन जिल्हे नंदुरबार (रु. ६६,११०), हिंगोली (रु. ६६,९९८), गडचिरोली (रु. ७०,९११( असून पुणे (रु.२,०४,६०), ठाणे (रु.२,१७,०९४) व मुंबईचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक रुपये २ लाख ५८ हजार ७४९ इतके आहे..
- मुंबई, ठाणे व पुणे येथील महानगरांचे दरडोई उत्पन्न आणि ग्रामीण जिल्ह्यांचे उत्पन्न हे विषमतेची प्रचंड दरी निर्माण करते.

### राज्याच्या सरासरीपेक्षा आदिवासींचे दरडोई उत्पन्न रुपये ८१ हजार २८९ने कमी:

राज्याचे आर्थिक सर्वेक्षण स्पष्टपणे राज्याची सरासरी व आदिवासीबहुल जिल्हे या दरम्यानच्या दरडोई उत्पन्नातील असमर्थता दर्शविते. जर आपण नंदूरबार (रुपये ६६,११०) आणि गडचिरोली (रुपये ७०,९११) यासारख्या आदिवासींचे प्राबल्य असणाऱ्या जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नाची तुलना केली तर आपणास असे दिसून येते की, पुणे (रुपये २,०४,०६०), ठाणे (रुपये २,१७,०९४) व मुंबईचे (रुपये २,५८,७४९) आहे. तर राज्याचे दरडोई उत्पन्न हे (रुपये १४७३९९) इतके आहे. यांचे दरडोई उत्पन्न हे नंदूरबार व गडचिरोलीच्या दरडोई उत्पन्नाच्या जवळपास तिप्पट आहे. मुंबई-ठाणे-पुणे व गडचिरोली-नंदूरबार यांच्या दरडोई उत्पन्नातील तफावत साधारणत: रुपये १,९२,६३९ इतके भरते. तर राज्याच्या सरासरीची तफावत साधारणत: रुपये ८१,२८९ इतकी भरते.

# जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक

तक्ता क्रमांक ३

| जिल्हा | मानव विकास निर्देशांक २०११ | माविनि स्थिती | जिल्हा | मानव विकास निर्देशांक २०११ | माविनि स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| नंदूरबार | ०.६०४ | अल्प | बीड | ०.६७८ | मध्यम |
| गडचिरोली | ०.६०८ | | परभणी | ०.६८३ | |
| वाशिम | ०.६४६ | | बुलढाणा | ०.६८४ | |
| हिंगोली | ०.६४८ | | यवतमाळ | ०.७०० | |
| उस्मानाबाद | ०.६४९ | | गोंदिया | ०.७०१ | |
| नांदेड | ०.६५७ | | अमरावती | ०.७०१ | |
| जालना | ०.६६३ | | भंडारा | ०.७१८ | |
| लातूर | ०.६६३ | | चंद्रपूर | ०.७१८ | |
| धुळे | ०.६७१ | | | | |
| अहमदनगर | ०.७२० | उच्च | सांगली | ०.७४२ | अति उच्च |
| अकोला | ०.७२२ | | नाशिक | ०.७४६ | |
| वर्धा | ०.७२३ | | सिंधुदुर्ग | ०.७५३ | |
| जळगाव | ०.७२३ | | रायगड | ०.७५९ | |
| औरंगाबाद | ०.७२७ | | कोल्हापूर | ०.७७० | |
| सोलापूर | ०.७२८ | | नागपूर | ०.७८६ | |
| रत्नागिरी | ०.७३२ | | ठाणे | ०.८०० | |
| सातारा | ०.७४२ | | पुणे | ०.८१४ | |
| | | | मुंबई | ०.८४१ | |
| | | | **महाराष्ट्र** | **०.७५२** | |

*आधार: महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२*

## आदिवासी जिल्हे व तालुक्यांतील मानव विकास निर्देशांकात लक्षणीय मागासलेपण:

आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, नागरी सुखसोयी, दरडोई उत्पन्न, रोजगार, खर्च करण्याची क्षमता इ.याआधारे मानव विकास निर्देशांक काढला जातो. आरोग्यदायी दीर्घायुष्य, ज्ञान आणि दर्जेदार राहणीमान या तीन परिमाणाचा मानव विकासात विचार केला जातो. भारत मानव विकास अहवाल २०११ नुसार केरळ ०.७९० देशात प्रथम क्रमांकावर आहे.

त्यापाठोपाठ दिल्ली ०.७५०, हिमाचल प्रदेश ०.६५२, गोवा ०.६१७, पंजाब ०.६०५, त्यानंतर महाराष्ट्र ०.५७२ सह सहाव्या क्रमांकावर आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही मानव विकास निर्देशांकाची उच्च विकसित, विकसित, गरीब अशी जिल्हानिहाय विभागणी झाली.

महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांपैकी ९ अति उच्च विकसित ०.७४२ आणि त्यापेक्षा जास्त १) मुंबई -०.८४१, पुणे ०.८१४, ठाणे ०.८००, ८ उच्च विकसित ०.७२० ते ०.७४२, २) सातारा - ०.७४२, रत्नागिरी ०.७३२, सोलापूर -०.७२८, ८ मध्यम विकसित ०.६७८ ते ०.७१८ ३) चंद्रपूर, ०.७१८, अमरावती ०.७०१, ९ जिल्हे अल्प विकसित, ०.६७१ व त्यापेक्षा कमी आहेत., ४) नंदूरबार - ०.६०४, गडचिरोली - ०.६०८ हे सर्वात शेवटी आहेत. राज्यातील तालुका स्तरावर मानव विकास निर्देशांक विचार करता, सर्वोच्च पातळीवरील पुणे जिल्ह्यातील तालुका ( पुणे ०.८८८) आणि सर्वात खालचा (तळाचा) नंदूरबार जिल्ह्यांतील तालुका (अक्राणी ०.०५९) यांच्यामधील फरक, अतिहानीकारक आहे. आदिवासी समाजाचा दर्जा हा आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, नागरी सुखसोयी आणि शासकीय सेवांचा उपयोग यांच्याशी संबंधित असणाऱ्या प्रत्येक निर्देशकांच्या बाबतीत सर्वसाधारण लोकसंख्येपेक्षा निम्मे आहे.

# स्वातंत्र्याच्या ७ व्या दशकातही आदिवासींची स्थिती वंचितच

## आदिवासी लोकसंख्येबाबतचा विकास निर्देशांकाचा गोषवारा

तक्ता क्रमांक ४

| अ.क्र. | निर्देशांक | राज्य | आदिवासी |
|---|---|---|---|
| १ | स्त्री साक्षरता(%) | ६९ | ४१ |
| २ | बालरोग प्रतिकारक्षमता(%) | ६२.५ | ३९ |
| ३ | बालमृत्यू दर ( आयएमआर) | ४८ | ८० |
| ४ | दरडोई उत्पन्न ( रुपये) | १,४७,३९९ | ५८,६०३ (गडचिरोली) |
| ५ | बालकांमधील कुपोषण (-३ एसडी) | १२ | २९ |
| ६ | तालुका विकास निर्देशांक सर्वोच्च पातळीवरील १५ तालुके विरुध्द खालच्या पातळीवरील १५ तालुके | ०.७९७ | ०.२५२ |

*( स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१६ व केळकर समिती अहवाल)*

या मर्यादित आकडेवारीवरून असे सुचित होते की, विविध निर्देशांकावरून आदिवासी लोकांची स्थिती, राज्य सरासरीपेक्षा खूपच खालावलेली असून तुटीचे प्रमाण ३८ ते १४२% इतके आहे.

राज्यातील विषमतोल व असमान प्रादेशिक विकासामुळे एकत्रित नसलेल्या आकडेवारीमध्ये, वंचितपणा, गरिबी व असहायता पूर्णपणे दिसून येत नाही. सद्य:स्थितीत, महाराष्ट्रातील आदिवासी लोक हे केवळ अत्यंत गरीब व अतिशय उपेक्षित घटकच नाही तर ते अत्यंत शोषित आणि दुर्लक्षित गट देखील आहेत.

# आदिवासींचा शासनाला विसर

## आदिवासींचे आरोग्य व कुपोषण:

कुपोषित मुलांना गावपातळीवर उपचारासाठी ग्राम बाल विकास केंद्रे (व्हीसीडीसी), जी सध्या सरकारने बंद केली आहेत. गाव पातळीवर कुपोषणाला आळा घालण्यासाठी महत्वाची ग्राम बाल विकास केंद्रे सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत, अंगणवाडीच्या माध्यमातून चालवली जात होती, ती सप्टेंबर २०१५ पासून बंद करण्यात आली आहेत.

कुपोषित मुलांना उपचार देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर चाईल्ड ट्रीटमेंट सेंटर (सीटीसी) तसेच ग्रामीण रुग्णालय स्तरावर पोषण पुनर्वसन केंद्रे (एनआरसी) सध्या सरकारने बंद केली आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रातील बालमृत्यू दर सुमारे ६०-७०% इतका असून तो राज्याच्या सरासरीपेक्षा उच्च आहे.( केळकर समिती अहवाल)

महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीनुसार अर्भक मृत्यूदर हजारामागे २१इतका आहे. म्हणजेच आजही महाराष्ट्रात हजारामागे २१ बालकांना अपुऱ्या सोयी-सुविधा अभावी आपला जीव गमवावा लागत आहे व यामागील बहुतांशी मुले आदिवासी विभागातील आहेत.

राज्यातील विशेषत: आदिवासी भागातील अर्भक मृत्यू आणि माता मृत्यू कमी करण्यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्रात कार्यान्वित असलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये एकसूत्रता व प्रभावीपणा आणण्याच्या दृष्टीने सर्व घटक कार्यक्रमांना एकत्र करून शासनाने नवसंजीवनी योजना सुरू केली आहे.

*तक्ता क्र. ५.* **नवसंजीवनी योजनांतर्गत बालमृत्यूची माहिती**

| वर्ष | ० ते १ वयोगट | १ ते ६ वयोगट | एकूण |
|---|---|---|---|
| २००४-०५ | ५५१८ | २४८५ | ८००३ |
| २००५-०६ | ५४०९ | २२८१ | ७६९० |
| २००६-०७ | ५८०६ | २१९७ | ८००३ |
| २००७-०८ | ४७९२ | १९१३ | ६७०५ |
| २००८-०९ | ४५२५ | १५६१ | ६०८६ |
| २००९-१० | ४४४३ | १८३७ | ६२८० |
| २०१०-११ | ४१२० | १७२५ | ५८४५ |
| २०११-१२ | ३५६४ | १३५० | ४९१४ |
| २०१२-१३ | ३५०७ | १०७४ | ४५८१ |
| २०१३-१४ | २९६५ | ९९७ | ३९६२ |
| २०१४-१५ | ३०२२ | ११६४ | ४१८६ |
| २०१५-१६ | १९१७ | ७६२ | २६७९ |
| २०१६-१७ | १३४० | ५२५ | १८६५ |
| **एकूण** | **५०९२८** | **१९८७१** | **७०७९९** |

*(स्रोत: आरोग्य संचालनालयाचा ऑक्टोबर २०१६ अखेरचा अहवाल)*

- **राज्यात बालमृत्यूचे प्रमाण कमी असल्याची पोकळ वल्गना करणाऱ्या महाराष्ट्रात वर्ष २००४-०५ ते २०१६-१७ या १३ वर्षात ७० हजार ७९९ बालमृत्यूंची नोंद.**
- **राज्यात वर्षाला सरासरी ५ हजार ९७९ बालमृत्यू होतात.**
- **० ते १ वयोगटातील बालमृत्यूचे प्रमाण प्रतिवर्षी सरासरी ४ हजार ३०० इतके असून १ ते ६ वयोगटातील बालमृत्यूचे सरासरी प्रमाण १ हजार ६७९ इतके आहे.**
- **वर्ष २००४-०५ ते २०१५-१६ मध्ये ० ते १ वयोगटातील ५० हजार ९२८ बालमृत्यूंची नोंद झाली.**
- **वर्ष २००४-०५ ते २०१५-१६ मध्ये १ ते ६ वयोगटातील १९ हजार ८७१ बालमृत्यूंची नोंद झाली.**
- **११ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (२००७-१२) ३७ हजार ८३३ बालमृत्यू झालेले आहेत**
- **१२ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (२०१२-१३ पासून) १७ हजार २७३ बालमृत्यू झालेले आहेत.**

# शासनाने दडवली आदिवासी जिल्ह्यातील कुपोषणाची माहिती

## राज्यातील आदिवासी कुपोषणाच्या विळख्यात

राज्यातील आदिवासी कुपोषित बालकांची संख्या ११५२६ आहे. माननीय अर्थमंत्रीनी मान्य केले की, राज्यात ५०,००० कुटुंबे कुपोषणाच्या विळख्यात आहेत १.९८ कोटी जनता उपाशी किंवा अर्धपोटी राहते राज्यातील १२५ तालुक्यातील मानव विकास निर्देशांक खालावल्याचे समोर आलेले आहे. राज्यातील २ कोटी नागरिकांची दिवसाला १२ रुपये खर्च करण्याचे ऐपत नसल्याचे आपलेच अर्थमंत्री सांगतात राज्याची एवढी विदारक परिस्थिती असताना शासनाची भूमिका कुचकामी ठरल्याचे दिसून येते. राज्य शासन नेहमीच राज्यात कुपोषणाचे प्रमाण फारच कमी असल्याची पोकळ वल्गना करत असते मात्र आरोग्य संचालनालयामार्फत ऑक्टोबर २०१६ रोजी प्रकाशित झालेला राज्याच्या आरोग्याचा अहवाल पाहता त्यात राज्यातील केवळ आदिवासी क्षेत्रामध्ये क्षेत्रामधील कुपोषणाचे भयानक चित्र समोर येते. सदर अहवालातील कुपोषण दर्शविणारा तक्ता खाली देण्यात आलेला आहे.

### राज्यातील आदिवासी भागातील कुपोषित बालकांची संख्या

तक्ता क्र. ६

| जिल्हा | २०१४-१५ | | | २०१५-१६ | | | २०१६-१७ (ऑक्टोबर १६अखेर) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मध्यम तीव्र कुपोषित | अति तीव्र कुपोषित | एकूण | मध्यम तीव्र कुपोषित | अति तीव्र कुपोषित | एकूण | मध्यम तीव्र कुपोषित | अति तीव्र कुपोषित | एकूण |
| ठाणे | ९४७ | १८४ | ११३१ | १९१ | ३२ | २२३ | ६२ | १३ | ७५ |
| पालघर | १६४६ | ३६० | २००६ | १०५८ | ७४२ | १८०० | १३६ | ५६ | १९२ |
| रायगड | १८ | २ | २० | ३७ | १२ | ४९ | ६६ | ७९ | १४५ |
| पुणे | १६८ | ३२ | २०० | १२९ | ३२ | १६१ | ८६ | २६ | ११२ |
| नाशिक | ३०८ | ७३ | ३८१ | ३३९ | ९१ | ४३० | ४३९ | १३० | ५६९ |
| अहमदनगर | २०६ | २१ | २२७ | २६३ | २४ | २८७ | २७९ | ३३ | ३१२ |
| धुळे | ७५०१ | २५५९ | १००६० | ५९६७ | १४७३ | ७४४० | १६६ | ४२ | २०८ |
| जळगाव | ३६ | १७ | ५३ | ८१ | २१ | १०२ | ६७ | १७ | ८४ |
| नंदूरबार | ५३०९ | ३८०७ | ९११६ | २६१ | १४२ | ४०३ | ४९०४ | ८५६ | ५७६० |
| अमरावती | ६२७ | ९१ | ७१८ | ७१२ | ८१ | ७९३ | १२०८ | २०० | १४०८ |
| यवतमाळ | १९८ | ५४ | २५२ | १३१ | ४२ | १७३ | ११५ | ३३ | १४८ |
| नांदेड | ४६ | १८ | ६४ | ४५ | १४ | ५९ | २० | ९ | २९ |
| गोंदिया | ७६ | २३ | ९९ | ७६ | १६ | ९२ | ८१ | १८ | ९९ |
| गडचिरोली | १०७८८ | २३३७ | १३१२५ | ९३९८ | २१६२ | ११५६० | ११७२ | १३६ | १३०८ |
| नागपूर | २२० | ४५ | २६५ | ५२९ | ७५ | ६०४ | ६४९ | ८७ | ७३६ |
| चंद्रपूर | १९७ | ३९ | २३६ | १८० | ६४ | २४४ | २०२ | ६७ | २६९ |
| **एकूण** | **२८२९१** | **९६६२** | **३७९५३** | **१९३९७** | **५०२३** | **२४४२०** | **९७२४** | **१८०२** | **११५२६** |

*स्त्रोत: आरोग्य सेवा संचालनालयाचा अहवाल ऑक्टोबर २०१६*

- **राज्यातील आदिवासी भागात वर्ष २०१५-१६ मध्ये २४ हजार ४२० कुपोषित बालकांची नोंद झाली असून त्यातील ५ हजार २३ अति तीव्र कुपोषित तर १९ हजार ३९७ बालके ही मध्यम तीव्र कुपोषित अशी आढळलेली आहेत.**
- **राज्यातील आदिवासी भागात वर्ष २०१६-१७ मध्ये (ऑक्टोबर, २०१६ अखेर पर्यंत) ११ हजार ५२६ कुपोषित बालकांची नोंद झाली असून त्यातील १ हजार ८०२ अति तीव्र कुपोषित तर ९ हजार ७२४ बालके ही मध्यम तीव्र कुपोषित अशी आढळलेली आहेत.**
- **वर्ष २०१६-१७ मध्ये राज्यांतील सर्वात जास्त कुपोषित जिल्हे नंदूरबार, अमरावती, गडचिरोली जिल्ह्यात ० कुपोषित बालकांची नोंद दिसत आहे. त्याबाबतची माहिती आरोग्य सेवा संचालनालयाला प्राप्त झालेली नाही.**

## प्रगत महाराष्ट्रातील आदिवासी देशांतील आदिवासींपेक्षा दुर्दैवी

### भारतातील व महाराष्ट्रातील कुपोषित प्रौढ पुरुष व स्त्रिया यांचे प्रमाण

तक्ता क्रमांक ३ ( टक्केवारी)

| प्रवर्ग | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| भारत- आदिवासी | ४० | ४९ |
| महाराष्ट्र आदिवासी | ५२.६ | ६२.५ |

*(स्त्रोत: नियोजन आयोग, २०११)*

देशातील शंभरात ४० आदिवासी अर्धपोटी व कुपोषित तर प्रगत महाराष्ट्रात ५२ आदिवासी अर्धपोटी व कुपोषित राज्यातील आदिवासींची एवढी दारुण परिस्थिती असताना आमची मान ताठ कशी राहू शकते. जर पोषण आहार हा मानवी विकासाचा निर्देशांक म्हणून विचारात घेतला तर, महाराष्ट्रातील आदिवासी लोक हे देशातील सरासरी आदिवासी लोकांपेक्षा अधिकच वंचित आहेत. भारतीय मानव विकास अहवालामध्ये असे प्रतिपादन केले आहे की, महाराष्ट्रातील आदिवासी लोकांची परिस्थिती, देशातील सरासरीपेक्षा अत्यंत दयनीय अशी आहे.

*( स्त्रोत: नियोजन आयोग, २०११:७१)*

## आश्रमशाळा की शैक्षणिक कत्तलखाने

# शैक्षणिक वर्ष संपले तरी शिष्यवृत्ती/निर्वाह भत्ता नाही

राज्यात ५५४ शासकीय व ५५५ अनुदानित आश्रमशाळा अशा एकूण १,१०९ आश्रमशाळा आहेत. तर २०० आश्रमशाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालय त्यातील बऱ्याच आश्रमशाळा आज मोडकळीस आलेल्या आहेत. कोणतेही वंचित समाजाला मुख्य प्रवाहात अणण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हे आहे. मात्र याबाबत आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थिनींना ज्या आश्रमशाळांतून शिक्षण पुरवले जाते. त्या आश्रमशाळांची, वसतिगृहांची दुरवस्था पाहता तिथे मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता दिसून येते. पडके, गळणारे छप्पर, विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नसणे, संरक्षक भिंत नसणे, सडके अपुरे अन्न, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष, फाटकी मळलेली अंथरुण-पांघरुण, आंघोळीसाठीही पाण्याची सोय नाही. मुलींनाही नदीवर, ओढ्याच्या ठिकाणी उघड्यावर आंघोळ व शौचाला जावे लागते. जेवणात चपाती आणि भाज्यांचा सर्रास अभाव, अनेक ठिकाणी विजेअभावी अंधारात रहावे लागतेय, वसतिगृहातल्या घाणीच्या साम्राज्यामुळे मुलांना अनेक आजारांना तोंड द्यावे लागते. तेल, साबण, गणवेश, बूट काहीही मिळत नाही. मागील १५ वर्षात महाराष्ट्र राज्यातील आश्रमशाळांमधून १ हजार ७७ मुलांचा मृत्यू झाल्याची कबुली केंद्रीय आदिवासी विकास खात्याचे राज्यमंत्री श्री. मनसुखभाई वसावा यांनी मे, २०१६ रोजी लोकसभेत दिली होती. इतक्या वाईट स्थितीत शिक्षण घेणारा आदिवासी केवळ कायदा, योजना, पॅकेजेस आणि भाषण देऊन मुख्य प्रवाहात कसा येईल.

### वसतिगृह की कारागृह :

आदिवासी मुलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले पाहिजे व त्यासाठी सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत हे शासनाचे घटनादत्त कर्तव्य आहे. घरापासून दूर राहून शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या निवासाचा प्रश्न सुटावा यासाठी शासकीय वसतिगृह अस्तित्वात असलेल्या वसतिगृहांची अवस्था पाहून आदिवासींनी शिकायचे की नाही हाच प्रश्न पडतो. अपुरे मनुष्यबळ, मूलभूत सोयी सुविधांचा अभाव, शासन निर्णयाचा भंग करून दिले जाणारे निकृष्ट भोजन, स्नानगृह - शौचालयाच्या दुरवस्थेमुळे आदिवासी विद्यार्थी विशेष म्हणजे मुलींच्या सन्मानाचा होणारा भंग वसतिगृहात रोज पाहायला मिळतोय. आता ही परिस्थिती असह्य झाली असून येथे शिकणाऱ्या तरुणाईचा आता श्वास घुटमळत आहे. सुविधांचा बोजवारा असलेल्या वसतीगृहात आदिवासी विद्यार्थ्यांचा श्वास कोंडतो आहे.

एकीकडे आवश्यकतेपेक्षा अत्यंत कमी वसतिगृह आहेत तर दुसरीकडे आहेत वसतिगृह त्यांची अवस्था जनावरांच्या गोठ्यांसारखी झाली आहे. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी सरकारने शासन निर्णय जारी केला आणि २५ हजार मुले वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहतात हे मान्य केलेले आहे.

उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना यामध्ये राहून शिक्षण घेता यावे हा त्याप्रमाणे उद्देश आहे. या विद्यार्थ्यांना आपण शिष्यवृत्ती देतो व निर्वाहभत्ता देतो. ही योजना केंद्र शासन पुरस्कृत आहे. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना आपण १२०० रुपये तर न राहणऱ्या ५५० रुपये प्रति महिने देत असतो. त्यांचा अभ्यासदौरा, प्रबंधलेखन आणि छपाईसाठी प्रत्येकी वार्षिक १६०० रुपये भत्ता देत असतो. हे देण्यामागचे कारण त्या मुलांनी उच्चशिक्षित व्हावे. स्वाभिमानी व आरोग्यदायी व्हावे हेच आहे. त्यांचे पालक हे करू शकत नाही. ते दारिद्र्याने गांजलेले आहेत. त्यांचे पालक एकवेळचे अन्न देखील घेऊ शकत नाहीत. अशा आदिवासी विद्यार्थ्यांना आपण वसतिगृहात ठेवतो.

मार्च महिना संपत आला. आर्थिक वर्ष संपत आले. विद्यार्थ्यांच्या परीक्षा तोंडावर आल्या वा काही विद्यार्थ्यांच्या झाल्यादेखील परंतु शासनाने राज्यातील या उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीच्या शिष्यवृत्ती निर्वाह भत्ता मार्च २०१७ पर्यंत दिला गेलेला नाही.

# राज्यात आदिवासींची साक्षरता ५६ टक्के तर आदिवासी महिलांची साक्षरता ४९ टक्के!

तक्ता क्र.८ **जनगणना २०११ नुसार आदिवासींची लोकसंख्या व साक्षरता**

| जिल्हे | आदिवासींची लोकसंख्या | | | आदिवासींची साक्षरता | | | एकूण साक्षरतेचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | पुरुष | महिला | एकूण | पुरुष | महिला | |
| ठाणे | १५४२४५१ | ७६९१९२ | ७७३२५९ | ७६११२१ | ४४०६५४ | ३२०४६७ | ४९.३४ |
| रायगड | ३०५१२५ | १५३६५७ | १५१४६८ | १४९६१० | ८६२१७ | ६३३९३ | ४९.०३ |
| रत्नागिरी | २०३७४ | १०४०२ | ९९७२ | ११४१९ | ६६६२ | ४७५७ | ५६.०५ |
| धुळे | ६४७३१५ | ३२७०३४ | ३२०२८१ | २७४३१३ | १६०४२१ | ११३८९२ | ४२.३८ |
| नंदूरबार | ११४१९३३ | ५६८०२६ | ५७३९०७ | ५२८३७८ | ३००४५६ | २२७९२२ | ४६.२७ |
| जळगाव | ६०४३६७ | ३१०१५० | २९४२१७ | २९५९१२ | १७६१३१ | ११९७८१ | ४८.९६ |
| नाशिक | १५६४३६९ | ७९२५४७ | ७७१८२२ | ८७१०१७ | ४९३९८५ | ३७७०३२ | ५५.६८ |
| अहमदनगर | ३७८२३० | १९११६५ | १८७०६५ | १९८३०६ | ११६३३९ | ८१९६७ | ५२.४३ |
| पुणे | ३४८८७६ | १७९१३२ | १६९७४४ | २१९३१२ | १२४३८० | ९४९३२ | ६२.८६ |
| सोलापूर | ७७५९२ | ३९७८५ | ३७८०७ | ४६७४७ | २७२४२ | १९५०५ | ६०.२५ |
| सातारा | २९६३५ | १५२१० | १४४२५ | १८२६९ | १०१७३ | ८०९६ | ६१.६५ |
| कोल्हापूर | ३०२०६ | १५४७८ | १४७२८ | २१२७६ | ११७८४ | ९४९२ | ७०.४४ |
| सांगली | १८३३३ | ९४०६ | ८९२७ | ११९३० | ६५८० | ५३५० | ६५.०७ |
| सिंधुदुर्ग | ६९७६ | ३५७५ | ३४०१ | ५०७५ | २७४२ | २३३३ | ७२.७५ |
| औरंगाबाद | १४३३६६ | ७३८७६ | ६९४९० | ७४२३८ | ४४५२५ | २९७१३ | ५१.७८ |
| जालना | ४२२६३ | २१९८८ | २०२७५ | २२८९० | १३८४८ | ९०४२ | ५४.१६ |
| परभणी | ४०५१४ | २०५७० | १९९४४ | २२७३४ | १३२८१ | ९४५३ | ५६.११ |
| हिंगोली | १११९५४ | ५७६७४ | ५४२८० | ६८२४८ | ३९७२९ | २८५१९ | ६०.९६ |
| लातूर | ५७४८८ | २९८७२ | २७६१६ | ३५८०८ | २०५०४ | १५३०४ | ६२.२९ |
| उस्मानाबाद | ३६०३९ | १८५६९ | १७४७० | २०५८७ | १२०३६ | ८५५१ | ५७.१२ |
| बीड | ३२७२२ | १६८०६ | १५९१६ | १८६०७ | १०७२० | ७८८७ | ५६.८६ |
| नांदेड़ | २८१६९५ | १४३८९२ | १३७८०३ | १७२६५९ | १००४७६ | ७२१८३ | ६१.२९ |
| अकोला | १००२८० | ५१३५९ | ४८९२१ | ६९२९९ | ३८७८९ | ३०५१० | ६९.११ |
| वाशिम | ८०४७१ | ४१४०३ | ३९०६८ | ५१७२७ | २९७७१ | २१९५६ | ६४.२८ |
| अमरावती | ४०४१२८ | २०५८३४ | १९८२९४ | २६१७५३ | १४७६११ | ११४१४२ | ६४.७७ |
| यवतमाळ | ५१४०५७ | २६०८९६ | २५३१६१ | ३४४२६७ | १९२६५३ | १५१६१४ | ६६.९७ |
| बुलढाणा | १२४८३७ | ६४१५३ | ६०६८४ | ७१५७३ | ४१५५३ | ३००२० | ५७.३३ |
| नागपूर | ४३७५७१ | २२३५६६ | २१४००५ | ३२०१४२ | १७४८७४ | १४५२६८ | ७३.१६ |
| वर्धा | १४९५०७ | ७६६९८ | ७२८०९ | १०५४७३ | ५८७१९ | ४६७५४ | ७०.५५ |
| भंडारा | ८८८८६ | ४४५१५ | ४४३७१ | ६३१२० | ३४७३८ | २८३८२ | ७१.०१ |
| गोंदिया | २१४२५३ | १०५९४४ | १०८३०९ | १५१३३९ | ८३२६० | ६८०७९ | ७०.६४ |
| चंद्रपूर | ३८९४४१ | १९६७५३ | १९२६८८ | २५६३६३ | १४३९७१ | ११२३९२ | ६५.८३ |
| गडचिरोली | ४१५३०६ | २०७३७७ | २०७९२९ | २४८४६९ | १३९०४९ | १०९४२० | ५९.८३ |
| राज्य | **१०५१०२१३** | **५३१५०२५** | **५१९५१८८** | **५८८७१६१** | **३३५७५४३** | **२५२९६१८** | **५६.०१** |

*स्रोत : जनगणना २०११*

- **जनगणना २०११ नुसार राज्यात आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ५ लाख १० हजार २१३ इतकी असून त्यापैकी साक्षर आदिवासी ५८ लाख ८७ हजार १६१ इतकी (५६.०१ टक्के) आहे.**
- **राज्यात आदिवासी महिलांची लोकसंख्या ५१ लाख ९५ हजार १८८ इतकी असून त्यापैकी साक्षर महिलांची संख्या २५ लाख २९ हजार ६१८ इतकी (४८.६९ टक्के) आहे**

## आदिवासींच्या विकासासाठी केळकर समितीच्या महत्त्वपूर्ण शिफारशी

- आदिवासींच्या विकासासाठी आवश्यक साधनसंपत्ती पुरवून त्यांना सक्षम करणे हे आपल्या राज्याच्या धोरणांचे उद्दिष्ट असले पाहिजे. योग्य निधी व आदिवासी विकासाला चालना देणे आवश्यक आहे.
- आदिवासी लोकांचा मानवी विकास निर्देशांक राज्याच्या सरासरी इतका आणावा. आदिवासी लोकांचे दरडोई उत्पन्न सर्वाधिक प्रादेशिक दरडोई उत्पन्नाइतके किंवा त्यांच्या किमान ८०% इतके आणावे.
- जिल्हे व तालुके यांचा पुन्हा आराखडा तयार करावा, म्हणजे तेथे आदिवासी लोक बहुसंख्येने असतील असे एकूण जवळपास ८ जिल्हे व १०० तालुके असतील. आदिवासी समाजाला स्वत:चा विकास करता यावा यासाठी, त्यांच्या अधिकारात प्रक्रांती घडवून आणणे आणि त्यांच्या क्षमतेचा विकास करावा. जेणेकरून ५०% जनजाति उपयोजना अर्थसंकल्प नियंत्रणात येईल आणि ग्रामसभेकडून त्याचे व्यवस्थापन करता येईल.
- आदिवासी लोकांच्या जमीन सुधारणांची, अनुसूचित क्षेत्रांसाठी पंचायत विस्तार आणि वन हक्क अधिनियम यांची पूर्णपणे अंमलबजावणी करणे; ज्यामुळे कोणतेही आदिवासी कुटुंब किंवा गाव या तीन हक्कांपासून वंचित राहणार नाही.
- आदिवासी सल्लागार परिषदेची महत्त्वपूर्ण जबाबदारी लक्षात घेता, तिच्या वर्षातून किमान ६ वेळा, प्रत्येक वेळी एक पूर्ण दिवस, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठका घेण्यात याव्यात. आदिवासी सल्लागार समितीच्या वार्षिक कामगिरीचा अहवाल राज्य विधानसभेत सादर करण्यात यावा.
- महाराष्ट्र शासनाने विधानमंडळाच्या अधिनियमानुसार किंवा राज्यपालांच्या आदेशाने असे बंधनकारक करावे की, जनजाति क्षेत्र उपयोजनेचा निधी व्यपगत करू नये किंवा इतर प्रयोजनासाठी वळवू नये. (आंध्र प्रदेश विधानसभेने असा अधिनियम नुकताच संमत केला आहे.)
- विधानमंडळाची अनुसूचित जमाती कल्याण समिती पुन: स्थापित करावी व तिला स्थायी समितीचादर्जा द्यावा आणि तिचा अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवावा व त्यावर सखोल चर्चा करावी.
- दोन लक्ष आदिवासी युवकांना स्वयंरोजगार करता यावा यासाठी व्यवसाय शिक्षण/व्यावसायिक शिक्षण देणे आणि वित्तीय व व्यवस्थापन पाठबळ देण्यात यावे. सुशिक्षित बेरोजगार आदिवासी युवकांसाठी व्यवसायिक प्रशिक्षण देणे, वीज भांडवल आणि खेळते भांडवल उपलब्ध करुन देणे, तसेच बाजाराशी सांगड घालून देण्याची व्यवस्था करणे यांवर भर देणारे विशेष कार्यक्रम तयार केले पाहिजेत. आदिवासी युवकांकरिता असलेल्या व्यावसायिक प्रशिक्षणात कृषि, मत्स्यव्यवसाय, कृषि-उद्योग, वनिकरण, फलोत्पादन, जैवविविधता, जल व ऊर्जा व्यवस्थापन आणि स्थानिक उद्योगांमध्ये नव्याने उपलब्ध होणाऱ्या संधीची जाणीव करून देण्यावर भर असला पाहिजे.
- महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी अधिनियमांतर्गत रोजगारनिर्मिती प्रकल्प सर्व ग्रामसभांमध्ये हाती घेण्यात यावेत आणि जनजाति क्षेत्रातील आपद्ग्रस्तांचे हंगामी स्थानांतरणाचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने नियमित रोजगार पुरविण्यात यावा. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना कार्यक्रम आदिवासी क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर राबविण्यात यावा. किमान एक दशलक्ष आदिवासी कुटुंबाना म्हणजेच जनजाति उपयोजनेतील दोन दशलक्ष आदिवासी कुटुंबांना म्हणजेच जनजाति उपयोजनेतील दोन दशलक्ष प्रौढांना किमान २०० दिवसांचा रोजगार देण्याचे वार्षिक उद्दिष्ट पुढील १० वर्षांकरिता ठेवले पाहिजे.
- सर्व शिक्षा अभियानातील तरतुदींचे अनुपालन करून हंगामी स्थानांतरीत बालकांकरिता विशेष हंगामी वसतिगृहे अथवा इतर व्यवस्था केली पाहिजे.
- आदिवासी क्षेत्रातील माता, नवजात शिशु आणि बाल आरोग्य पोषण यात सुधारणा करण्यासाठी बालमृत्यू मूल्यन समितीच्या (महाराष्ट्र शासन २००५) शिफारशींची ताबडतोब अंमलबजावणी केली पाहिजे. एकात्मिक बाल विकास योजनेतील प्रत्येक बालकाच्या पोषणावरील तरतूद, जनजाति क्षेत्र उपयोजनेतील क्षेत्रांसाठी वाढविण्यात आली पाहिजे.

# शासन या गोष्टी करेल का?

कुपोषण हा आजार नसून खरा आजार भूक आहे. कुपोषणावर तात्पुरत्या मलमपट्टी करणाऱ्या उपाययोजनांनी हा प्रश्न सुटणारा नाही त्यासाठी भूक आणि दारिद्र्याच्या मुळावरच घाव घालावा लागेल. कुपोषणाचा प्रश्न हा भूकेशी, दारिद्र्याशी निगडीत असून त्या प्रश्नाची उकल करण्यासाठी तो प्रश्न समूळ संपविण्यासाठी आपल्याला दोन आघाड्यांवर काम करण्याची गरज आहे. एक म्हणजे तात्काळ करावयाची उपाययोजना आणि दुसरे म्हणजे दूरगामी दीर्घकालीन उपाययोजना.

या प्रश्नांवर गेली तीन दशके ठाणे, पालघर, रायगड, नाशिक इथल्या आदिवासी दुर्गम भागात प्रत्यक्ष काम करीत असताना अनुभवाच्याआधारे आम्ही जी निरीक्षणे नोंदवली त्याच्याआधारे आम्ही काही तात्काळ करावयाच्या उपाययोजना तसेच दीर्घकालीन उपाययोजना सुचवित आहोत. आपण याचा सहानभूतीने विचार करून शासनाला स्पष्ट निर्देश द्यावेत ही विनंती.

कुपोषणावर मलमपट्टीचे उपचार करून स्वातंत्र्यांच्या ७० वर्षानंतरही आपण गरिबीची चेष्टा करीत आहोत. हा या देशावर आणि समाजावर लागलेला कलंक आहे. याचे भान ठेवून या देशात कुणी उपाशी रहाणार नाही अशी व्यवस्था करणे ही आपली घटनात्मक जबाबदारी आहे. सन्मानाने जगण्याचा मूलभूत अधिकार या देशातल्या प्रत्येक व्यक्तीला संविधानाने बहाल केला आहे. त्यामुळे तो प्रत्येकाला देणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. यासाठी निधीची कमतरता हे कारण शासनाने देऊ नये. जोवर आदिवासींचे दारिद्र्य जात नाही तोवर भूकबळी जातच रहाणार हे लक्षात घ्यावे आदिवासी भागातील वनांचा आणि शेतीचा विकास तसेच रोजगार, सिंचन व्यवस्था, दळणवळण व संपर्काची साधने सक्षम करणे आवश्यक आहे.

**उपाययोजना:**

**<u>आरोग्य :</u>**

१. राज्यात आता तातडीने निर्माण झालेल्या कुपोषित बालकांच्या वाढत्या मृत्यूंबाबत आम्ही शासनाला सप्टेंबर २०१५ पासून सातत्याने जागृत करीत आहोत. 'ग्राम बाल विकास केंद्र' बंद झाल्याने बालमृत्यूत वाढ होईल याची कल्पना डिसेंबर २०१५ला मा. मुख्यमंत्री महोदयांना आम्ही स्वत: भेटून दिली होती. त्यानंतर ही योजना तात्काळ सुरू करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री महोदयांनी आम्हाला दिले. परंतु प्रत्यक्षात आजही ही 'ग्राम बाल विकास केंद्र' सुरू करण्यात आलेली नाहीत. जानेवारी २०१६ मध्ये भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम 'अमृत आहार योजने'ची घोषणा करण्यात आली परंतु बहुसंख्य ठिकाणी ती आजही कार्यान्वित करण्यात आलेली नाही. त्याशिवाय 'ग्राम बाल विकास केंद्र' ही कुपोषित मुलांच्या पूरक पोषण आहारासाठीची योजना होती, मात्र 'अमृत आहार योजना' ही गर्भवती व स्तनदा मातांसाठी बनविण्यात आलेली असून यात कुपोषित बालकांना समाविष्ट करण्यात आलेले नाही. कुपोषित बालकांशिवाय ही योजना अत्यंत सदोष असून ती आहे त्या स्वरुपात अंमलात येणे पूर्णपणे अव्यवहार्य आहे.

२. THR अंतर्गत मिळणारे अन्न हे जनावरांना ही खाण्याच्या योग्यतेचे नसल्याने पूर्णपणे बंद करण्यात येऊन ताजा पोषण आहार मुलांना मिळेल अशी व्यवस्था करावी. तसेच प्रत्येक दिवसाला प्रत्येक मुलामागे पोषण आहारासाठी ५रु. ९२ पै. देण्यात येत आहेत. ते महागाई निर्देशांकानुसार देण्यात यावेत. पोषण आहारासाठी मिळणारा हा निधी महागाई निर्देशांकाशी जोडलेला असावा.

३. अंगणवाडी सेविकांचे आणि मदतनीसांचे मानधन तसेच आहाराचे पैसे ६-६ महिने दिले जात नाहीत. केंद्राचा निधी यायची वाट न पाहता हा निधी वेळेपूर्वी पोहोचेल याची दक्षता घ्यावी.

४. कुपोषित मुलांच्या सर्वेक्षणामध्ये तात्काळ बदल करून कुपोषित मुलांची आकडेवारी अंगणवाडी सेविकामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्राप्रती प्रमाणित करण्यात यावी. दर महिन्याच्या ५ तारखेच्या आत ही आकडेवारी प्रमाणित करण्यात यावी व Real Time Monitoring पद्धतीने त्याची नोंद ठेवण्यात यावी तसेच ती Online करण्यात यावी.

५. मध्यम तीव्र कुपोषित आणि अति तीव्र कुपोषित बालकांसाठी पोषण पुनर्वसन केंद्र आणि बाल उपचार केंद्र प्राथमिक आरोग्य केंद्रातच तात्काळ सुरू करण्यात यावीत. त्यासाठी आवश्यक कर्मचारी वर्ग आणि पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

६. अंगणवाडीतील सर्व बालकांना रोज एक अंडे आणि केळी देण्यात यावीत. अंगणवाडीतील सर्व बालकांना ३० मिली. खाद्यतेल देण्यात यावे.

७. कुपोषणग्रस्त भागातील सर्व आदिवासी कुटुंबांना अंत्योदय योजनेचा लाभ देण्यात यावा. आणि त्यांच्या प्रत्येक रेशनकार्डवर ५ किलो खाद्यतेल, ५ किलो डाळ, ५ किलो साखर किंवा गूळ हा अंत्योदय योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या अत्यल्प दरात उपलब्ध करून द्यावा.

८. आरोग्य विभागात योजनेची अंमलबजावणी करणारे हातच जर नसतील तर सक्षम अंमलबजावणीची अपेक्षा तरी कशी ठेवायची? राज्यात आणि पालघर जिल्ह्यात कुपोषणाशी संबंधित सर्व विभागांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे आहेत ती विनाविलंब भरण्यात यावीत. आरोग्य विभागात विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी ५७२ मंजूर असताना ४१३ पदे (७२ टक्के) रिक्त आहेत.

९. प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था अत्यंत दयनीय असून केवळ एका वैद्यकीय अधिकाऱ्यांवर ती अवलंबून आहे. विनाविलंब तात्काळ कुपोषणग्रस्त भागात किंवा अनुसूचित क्षेत्रात सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना एक एम.बी.बी.एस वैद्यकीय अधिकारी व दोन बी. ए. एम.एस. अधिकारी नियुक्त करण्यात यावेत आणि त्यांच्यासाठी सुसज्ज निवासस्थानाची व्यवस्था करण्यात यावी.

१०. राज्यात आदिवासी क्षेत्रात काम करणारे ७९१ वैद्यकीय अधिकारी गेली १२ वर्षे अस्थायी पद्धतीने काम करीत आहेत. त्यांना विनाविलंब सेवेत कायम करण्यात यावे.

११. राज्यात वैद्यकीय आरोग्य सेवा गट 'अ' आणि गट 'ब' यांच्या एकूण मंजूर ८,७२५ पैकी १,७२८ इतकी पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवेच्या १०२७ मंजूर पदांपैकी २४४ पदे रिक्त असून गट 'क' व गट 'ड' ची ११,६११ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांची श्रेणी 'अ' व 'ब' यांची ८२२७ मंजूर पदांपैकी १०४२ पदे रिक्त असून जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या २८२ पैकी १४५ पदे तर जिल्हा शल्य चिकित्सकांच्या ६३३ पैकी ३५९ पदे रिक्त आहेत.

१२. आदिवासी भागासाठी १०८ क्रमांकाच्या अतिरिक्त रुग्णवाहिका तात्काळ उपलब्ध करून देण्यात याव्यात.

१३. २ जून २०१२च्या शासन निर्णयानुसार कुटीर रुग्णालय जव्हार याचे श्रेणीवर्धन करून २०० खाटांचे रुग्णालय मंजूर करण्यात आले आहे. परंतु गेल्या ४ वर्षात एक वीटही रचली गेली नाही अथवा एका शिपायाचीही नेमणूक केलेली नाही. राज्यातील बहुतांशी ग्रामीण रुग्णालये १० वर्षांपूर्वी मंजूर असूनही फक्त कागदावर आहेत. त्यासाठी तात्काळ जागेची व निधीची उपलब्धता करून ते सुरू करण्यात यावे.

१४.प्रत्येक ग्रामीण रुग्णालयात स्त्रीरोग तज्ज्ञ व बालरोग तज्ज्ञ विनाविलंब नेमण्यात यावेत आणि त्यांना किमान १,५०,००० रु. इतके (मासिक वेतन व भत्ते मिळून) मिळतील अशी व्यवस्था करण्यात यावी.

**बाल विकास विभाग :**

१. राज्यात बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या ५५३ मंजूर पदांपैकी ३९० पदे रिक्त असून मुख्यसेविकांची ५७०, अंगणवाडी सेविकांची १,८८३ तर अंगणवाडी मदतनीसांची ५,४५२ पदे रिक्त आहेत.
२. बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्याची पालघर जिल्ह्यात १३ पैकी १२ पदे रिक्त असून उर्वरित एकाची ही आता बदली झालेली असून सर्व १३ पदे रिक्त राहिली आहेत. जिल्हा मुख्यालयात वर्ग ३ मधील ७ पैकी ६ पदे रिक्त असून विस्तार अधिकारी १४ पैकी ३ रिक्त आहेत. ८ मुख्य सेविका, ९१ अंगणवाडी सेविका, १३५ अंगणवाडी मदतनीस १११, मिनी अंगणवाडी सेविकांची पदे रिक्त आहेत.

**रोजगार हमी :**

१. कुपोषणाचा प्रश्न हा भूक, दारिद्र्याशी निगडीत असल्याने तो थेट रोजगाराशी जोडलेला आहे. रोजगार हमीची अंमलबजावणी राज्यभर एकूणच चिंताजनक आहे. गेल्या पाच वर्षात रोजगार २० टक्क्यांवर आला आहे. राज्यात जानेरारी - फेब्रुवारी २०१७ मध्ये ११,७६१ मस्टरचे पेमेंट झालेले नाही. १५ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर हा आदिवासी भागात भूकेचा काळ असतो या काळात वन विभागाची आणि सार्वजनिक बांधकामाची तसेच व्यक्तीगत लाभाची कामे निघू शकतात.
२. कामाची मागणी येण्याची वाट न पाहता युध्दपातळीवर अभियान राबवून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती केली गेली पाहिजे. कामाचे वेतन योग्य वेळात आणि नियमानुसार झाले पाहिजे. किमान वेतनापेक्षा कमी वेतन देण्यात येणार नाही याच्या स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.
३. पालघर जिल्ह्यात जिल्हास्तरावर रोजगार हमीची १८ पदे मंजूर असून ११ पदे रिक्त आहेत. उप जिल्हाधिकारी - रोजगार हमी योजना, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता ही सर्वपदे रिक्त आहेत. तालुका स्तरीय अव्वल कारकून ८ पैकी ५ पदे रिक्त आहेत. रोजगार हमी जिल्हा शाखेला वाहन, वाहन चालक आणि शिपाई नाही.
४. आदिवासी भागात १० ग्रामपंचायतीसाठी १ याप्रमाणे तांत्रिक अधिकारी नेमण्यात यावेत. त्यात केवळ कृषि ऐवजी स्थापत्य अभियंत्याचाही समावेश करण्यात यावा.
५. रोजगार हमी योजना नायब तहसिलदार हे पद सर्व आदिवासीबहुल तालुक्यात निर्माण करून भरण्यात यावे.
६. रोजगार हमी योजनेवर असणाऱ्या सर्व कंत्राटी DTP OPERETER कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत घेण्यात यावे. आज ते वापरत असलेले संगणक कालबाह्य झाले असून त्यांना उच्च क्षमतेचे संगणक फक्त रोजगार हमीच्या कामासाठी पंचायत समिती व तहसिल कार्यालयाला प्रत्येकी ४ विनाविलंब देण्यात यावेत त्यास जनरेटर, इंधन व वाय-फाय इत्यादी सेवा उपलब्ध करून देण्यात याव्यात.
७. रोजगार हमी योजनेखाली वैयक्तिक लाभाच्या योजनांवर भर द्यावा. उदाहरणार्थ शेती उत्पादक करणे, मृद आणि जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर निर्माण करणे. वृक्ष लागवड व फळझाडांची लागवड करणे इत्यादी तसेच

कायमस्वरूपी दारिद्र्य जाण्यासाठी त्यांना त्यांच्या स्वत:च्या शेतात काम करण्यासाठी रोजगार हमीतूनच मजूरी देण्यात यावी. ठक्करबाप्पा योजनेचा निधी जलसंधारणाकडे वर्ग करण्यात यावा.

८. रोजगार हमी योजनेंतर्गत ज्या विविध यंत्रणा रोजगार निर्मितीच्या कामात जबाबदार आहेत त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग ही प्रमुख यंत्रणा आहे. विशेषत: पावसाळ्यात जेव्हा वन विभागाशिवाय अन्य यंत्रणा काम करू शकत नाहीत त्यावेळी सार्वजनिक बांधकाम खात्याची कामे सहज उपलब्ध होऊ शकतात. परंतु सार्वजनिक बांधकाम खात्याचा कल ठेकेदाराकडून कामे करून घेण्याचा असतो. त्यामुळे मजूरनिर्मितीप्रधान कामाला अधिकारी प्राधान्य देत नाहीत व अनेक ठिकाणी कामास स्वारस्य दाखवत नाहीत. यासाठी रोजगार हमीच्या कामाबाबत टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व त्यांना या कामासाठी जबाबदार धरण्यात यावे.

**वनाधिकार :**

१. वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी अत्यंत सदोषपणे व धीम्यागतीने चालू आहे. एकट्या पालघर जिल्ह्यात ४२ हजार ६९३ दावे दाखल करण्यात आले. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन यापैकी १९ हजार ७११ दावे ग्रामसभेने नामंजूर करण्यात आल्याचे दाखविण्यात आले. केवळ उपविभागीय अधिकारी स्तरावर १८ हजार २२६ दावे मान्य करण्यात आले तर जिल्हास्तरावरील ६३८ दावे प्रलंबित ठेवून १७ हजार ५८९ दावे मंजूर करण्यात आले. उपविभागीय स्तरावर ३ हजार १२८ दावे अमान्य करण्यात आले. याचा अर्थ केवळ ४१ टक्के मान्य करण्यात आले असून ५९ टक्के दावे डावलण्यात आले.

२. दावे अमान्य करताना अन्यायकारक पद्धतीने करण्यात आले. काहींना बिगर आदिवासी म्हणून दाखविण्यात आले. तर काहींना दावे जिल्हा परिषदेकडे असतानाही महानगरपालिकेत दाखविले गेले.

३. सन २००२ साली ज्या वनपट्टेधारकांना पात्रतेचे दाखले मिळाले त्यांचे दावेही अमान्य करण्यात आले किंवा त्यांचे क्षेत्र अत्यल्प दाखविण्यात आले. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना फेर सुनावणी घेण्याचे आदेश देऊनही काहीही प्रगती झालेली नाही.

४. आदिवासी विकास विभागाकडे या कायद्याची अंमलबजावणी सोपविण्यात आली. ती करण्यासाठी त्यांनी महसूल खात्याला जिल्हा उपविभाग व तालुका पातळीवर कंत्राटी अधिकारी नेमण्यास सांगितले. परंतु तरीही त्यांचे वेतन कधीही वेळेत केले जात नाही.

**अन्य मागण्या :**

१. रेशन धान्य दुकानदारांना अंत्योदय योजनेखाली देण्यात येणारा मोबदला कमी असल्यामुळे त्यांचा भ्रष्टाचाराकडे कल वाढतो. वाहतूकीचा खर्च गोदाम ते रेशनिंग दुकान व हमाली हा खर्च शासनाने करावा व त्यांना मोबदलाही वाढवून यावा

२. शासन निर्णयाप्रमाणे संवेदनशील आदिवासी प्रकल्पात प्रकल्प अधिकारी म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी नेमण्यात येण्याचे निर्देश शासनास देण्यात यावेत. तोवर अप्पर जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्यात यावा.

३. कौशल्य विकासासाठी स्वतंत्र निधी आदिवासी क्षेत्राकरिता देण्यात यावा.

४. महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व अन्न व नागरी पुरवठा विभाग यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे कुपोषित बालके व माता यांची होणारी परवड लक्षात घेता मंत्रालयीन स्तरापासून

जिल्हा स्तरापर्यंत, जिल्हा स्तरापासून तालुका स्तरापर्यंत समन्वय समिती स्थापन करून त्याचे उत्तरदायित्व निश्चित करण्याचे निर्देश देण्यात यावेत.

५. आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सर्व सुविधांनी युक्त अशी निवासस्थानाची सोय करण्यात यावी.

६. संपर्क व्यवस्था अत्यंत खुजी असल्याने भ्रमणध्वनीचा संपर्क होऊ शकत नाही. सामाजिक उत्तरदायित्व म्हणून प्रत्येक मोबाईल कंपनीला विशिष्ट क्षेत्र पूर्णत्वाने जोडण्याची सक्ती करण्यात यावी हे न केल्यास अशा कंपन्यांवर बंदीची देखील कारवाई  देशभरात करावी.

७. **ग्रामीण भागात डॉक्टर्स उपलब्ध होत नाही**: नवीन वैद्यकीय अधिकारी या भागात येऊन काम करणे पसंत करीत नाहीत. त्यामुळे 'त्यामुळे आर्मी मेडिकल फोर्स'च्या धर्तीवर नागरी वैद्यकीय दल निर्माण करण्यात यावे. प्रत्येक मेडिकल कॉलेज मध्ये काही जागा या आरक्षित ठेवाव्यात आणि त्या जागेवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा शिक्षण आणि निवासाचा सगळा खर्च सरकारने उचलावा. या बदल्यात शिक्षण पूर्ण झाल्यावर त्या विद्यार्थ्यांना शासन सांगेल तिथे ग्रामीण भागात किमान पंधरा वर्षे शासकीय सेवा देण्याची सक्ती करावी.